॥ उठी उठी गोपाला ॥

गायकः कुमार गंधर्व
गीतः बाळ कोल्हटकर
संगीतः वसंत देसाई
नाटकः देव दीनाघरीं धांवला

मलयगिरीचा चंदन गंधित धूप तुला दाविला
स्वीकारावी पूजा आतां उठी उठी गोपाला ॥ धृ. ॥

पूर्व दिशेला गुलाल उधळून ज्ञानदीप लाविला
गोरस अर्पुनि अवघे गोधन गेले यमुनेला
धूपदीप नैवेद्य असा हा सदुपचार चालला
स्वीकारावी पूजा आतां उठी उठी गोपाला ॥ १ ॥

रांगोळ्यानी सडे सजविले रस्त्यारस्त्यांतून
सान पाउली वाजति पैंजण छनुनछनुनछुन्छुन
कुठे मंदिरी ऐकूं येते टाळ्यांची किणकिण
एकतानता कुठे लाविते एकतारिची धून
निसर्ग मानव तुझ्या स्वागता असा सिद्ध जाहला
स्वीकारावी पूजा आतां उठी उठी गोपाला ॥ २ ॥

राजद्वारी झडे चौघडा शुभःकाल जाहला
सागर तारी ऋषीमुनिंचा वेद घोष चालला
वन वेळूंचे वाजवी मुरली छान सूर लागला
तरु शिखरावर कोकिळ कवीने पंचम स्वरलाविला
स्वीकारावी पूजा आतां उठी उठी गोपाला ॥ ३ ॥